I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 312-317 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# मुलभूत अधिकार आणि त्यांचे सामाजिक, राजकीय परिणाम

प्रिया वि. सोनटक्के

सि.एच.बी. राज्यशास्त्र विभाग
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर.
*Corresponding Author: sontakkepriya961@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**
भारतीय संविधानातील मुलभूत अधिकार लोकशाहीच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण मानली जातात. समता, स्वातंत्र्य, न्याय, व बंधुता या लोकशाही तत्वाचे मिश्रण त्यामध्ये आढळून येते. व्यक्तीस्वातंत्र्याची जोपासना करण्यासाठी संविधानाने नागरीकांना ६ प्रकारचे मुलभूत अधिकार बहाल केलेले आहेत. या मुलभूत अधिकारामुळे भारतीय नागरीकांचे व समाजातील अल्पसंख्याक घटकांचे राज्यकर्त्याच्या स्वैराचारी एकांगी कृत्यापासून संरक्षण करण्यात आले आहे. राज्यांनी ध्येय धोरणे ठरवितांना स्वार्थी राजकारणापासून अलीप्त राहून सार्वजनिक हिताकडे लक्ष द्यावे.
मनुष्याला चांगले जीवन जगण्यासाठी जे अधिकार अत्यंत आवश्यक असतात. त्यालाच मुलभूत अधिकार म्हटले जाते. मुलभूत अधिकारातून व्यक्ती स्वातंत्र्याची जपणुक होत असते. कारण मुलभूत अधिकारावर अतिक्रमण झाल्यास न्यायालयात दाद मागता येते. मुलभूत अधिकरामुळे नागरीक स्वातंत्र्याची हमी प्राप्त होते. मुलभूत अधिकार निरंकुश असतात असे नाही तर व्यापक समाजहीताचा विचार करून त्यावर काही बंधने घातलेली आहेत.

**बीजशब्द :** मुलभूत अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, विवादास्पद अधिकार, न्यायालयीन संरक्षण, परमादेश, संघटना, राष्ट्रीय एकात्मता

**प्रस्तावना :**
अलिकडच्या काळात शिक्षणाचा वाढता प्रभाव, प्रसार माध्यमाचा वाढता प्रभाव, राजकीय सहभागाचे वाढते प्रमाण सर्वसामान्य लोकांमधील राजकीय जागृती आंतराष्ट्रीय संघटनेची मानवी हक्क प्राप्ती सतर्कता इ. कारणांमुळे मानवी हक्कांच्या रक्षणाकडे अधिक लक्ष दिले जाऊ लागले. भारतीय राज्यघटनेत मुलभूत हक्कांच्या रक्षणासंबंधी प्रत्यक्ष राज्यघटनेत तरतुद करण्यात आली आहे.

१९३१ च्या कराची कॉग्रेसमध्ये मुलभूत अधिकारांचा ठराव पं. जवाहरलाल नेहरू यांनी मांडला. स्वतंत्र भारताच्या संविधानात मुलभूत अधिकार असावेत हा निर्णय घटनासमितीने एकमताने घेतला हे मुलभूत अधिकार शासनावर बंधनकारक आहेत. शासनाने हया अधिकारांचा संकोच करणारा किंवा ते नष्ट करणारा कुठलाही कायदा करता काम नये.

व्यक्तीचे अधिकार आणि त्यासंबंधीचे चळवळ या विषयाला पाश्चात्य समुदायात खुप मोठा इतिहास आहे. अठराव्या शतकाच्या कालखंडात फ्रेंच आणि अमेरीकन राज्यक्रांतीच्या काळात झालेल्या चळवळीचा भारतीय विचारवंतावर थोडा का होईना प्रभाव निश्चितच पडला होता. समाज सुधारणेच्या चळवळी आणि विविध गटांच्या राजकीय चळवळीबरोबर 'मानवी हक्क' च्या मागणीसाठी कॉग्रेसने उपलब्ध करून दिलेले देशव्यापी व्यासपीठ याच प्रेरणेतून उभे राहिले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोकशाही शासनव्यवस्थेचा अंगीकार केला. लोकशाही प्रणालीत शासनास निरंकुश सत्ता प्राप्त होत नाही. शासनाच्या अधिकरांवर मर्यादा घालण्यात आलेल्या असतात. तसेच प्रत्येक नागरीकाला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा आणि सर्वांगीण विकासाच्या पर्याप्त संधी लाभलेल्या असतात. या अनुषंगाने संविधानात मुलभूत अधिकरांची तरतुद करण्यात आलेली आहे. मुलभूत अधिकरामुळे शासन व्यवस्थेच्या हाती असलेल्या सत्तेवर मर्यादा पडतात. नागरिक आपले अधिकार न्याययंत्रणेच्या माध्यामातून सुरक्षित ठेवू शकतात. भारतीय सवंधिनाच्या तिसऱ्या भागात कलम १४ ते ३५ मध्ये मुलभूत अधिकारांची तरतुद करण्यात आली आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाठी आवश्यक असलेले आणि शासनास सहजासहजी हिरावून घेता येणार नाहीत असे अधिकार म्हणजे नागरिकांचे 'मुलभूत अधिकार' होय. 'व्यक्तिस्वातंत्र्य' हा लोकशाहीचा गाभा असून त्यांच्या संरक्षणासाठी बहुतेक सर्व लोकशाही देशाच्या संविधानात मुलभूत अधिकाराची तरतुद केलेली आढळते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**
१. भारतीय समाजामध्ये मुलभूत अधिकाराविषयी जाणीव व जागृती निर्माण करणे.

२. मुलभूत अधिकाराचे महत्व अधोरेखित करणे.
३. मुलभूत अधिकाराचे सामाजिक, राजकीय परिणाम जाणून घेणे.

**मुलभूतअधिकाराच्या व्याख्या:**

''व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक व शासनास सहजासहजी हिरावून घेता येणार नाही असे अधिकार म्हणजे नागरिकांचे मुलभूत अधिकार होय.

प्रा. हेराल्ड लॉस्की याच्या मते, ''अधिकार म्हणजे समाज जिवनाच्या अशा अटी आहेत की, त्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वत:चा सर्वांगीण विकास करू शकत नाही.''

व्ही.एस. पायली यांच्या मते, ''मुलभूत अधिकाराद्वारे व्यक्तीचे स्वातंत्र्य व राज्याची शक्ती यावर मर्यादा घातल्या जातात.

**मुलभूत अधिकार:**

भारतीय संविधानाने नागरीकाला सहा मुलभूत अधिकार दिलेले आहेत. संविधानाच्या तिसऱ्या भागामध्ये कलम १२ ते ३५ मध्ये त्याचे वर्णन केलेले आहे.

१. समतेचा अधिकार – कलम १४ ते १८
२. स्वातंत्र्याचा अधिकार – कलम १९ ते २२
३. शोषणाविरूध्दचा अधिकार – कलम २३ ते २४
४. धर्म स्वातंत्र्याचा अधिकार – कलम २५ ते २८
५. सांस्कृतिक व शिक्षण विषयक अधिकार – कलम २९ ते ३०
६. घटनात्मक उपायाचा अधिकार – कलम ३२ ते ३५

**१. समतेचा अधिकार:**

संविधानात कलम १४ ते १८ यामध्ये समतेचा अधिकार देण्यात आला आहे.

अ. कायद्यापुढे समता: कलम १४ नुसार असे स्पष्ट केले आहे की, कायद्यानुसार सर्व नागरीक समान आहेत. तसेच कोणालाही कायद्याच्या समान संरक्षणापासुन वंचित केले जाणार नाही याची हमी देण्यात आलीकायद्याने समान संरक्षण देण्यात आले आहे. कायद्यासमोर धर्म, लिंग,जात, वंश गरीब–श्रीमंत असा भेद केला जाणार नाही.

ब. भेदभाव नसावा: कलम १५ नुसार ''राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग जन्म यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरीकाला प्रतिकुल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही. दुकाने, उपहारगृहे, सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे/साधने, सार्वजनिक विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि कोणत्याही सार्वजनिक ठिकाणांचा वापर करण्याचा समान अधिकार प्रत्येक नागरिकांस असून धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थळ यासारख्या कारणावरून त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येत नाही.

क. समान संधी: कलम १६ नुसार शासकीय नोकऱ्या व सार्वजनिक पदे देताना सर्वांना समान संधी दिली जाईल. धर्म, जात, वंश, लिंग, जन्म इ. कारणावरून कोणालाही अपात्र ठरविता येणार नाही.

ड. अस्पृश्यता निवारण: कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही स्वरूपात अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आली असून अस्पृश्यता पाळणे शिक्षापात्र गुन्हा समजला जाईल.

इ. पदव्याची समाप्ती: कलम १८ नुसार राज्य लष्करी व शिक्षणाविषयक पदव्या व्यतिरिक्त कोणतीही पदवी प्रदान करू शकणार नाही. तसेच पुर्वपरवानगी शिवाय भारतीय नागरीकाला कोणतीही परकीय पदवी स्विकारता येणार नाही. मात्र भारत सरकार लष्करी व भारतरत्न, पद्मश्री, पद्मभूषण अशा पदव्या देवू शकेल. तसेच भारतीय नागरिकास इतर कोणत्याही राष्ट्रांकडून कोणत्याही स्वरूपाची पदवी स्वीकारण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

या तरतुदीमध्ये काही अपवाद सार्वजनिनक हित, स्त्रिया, मागासवर्गीय दलित, लहान मुले यांच्या उन्नतीसाठी काही अपवाद संविधानाने मान्य केले. असून त्या संदर्भात कायदा करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला आहे.

**२. स्वातंत्र्याचा अधिकार:**

भारतीय समाजात रूढ असलेल्या सामाजिक व आर्थिक विषमतेवर मात करून प्रत्येकास लोकशाही अधिकार उपभोगता यावेत यासाठी स्वातंत्र्याचा अधिकार महत्वपूर्ण ठरतो. समतेप्रमाणे स्वातंत्र्य हा लोकशाहीचा प्रमुख आधार आहे. कलम १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचा अधिकाराचे वर्णन करण्यात आले असून मूळ संविधानाने ७ प्रकारची स्वातंत्र्ये होती. परंतु ४४ व्या घटनादुरूस्तीनुसार संपत्तीचा अधिकार वगळण्यात आल्याने आता सहा प्रकारची स्वातंत्र्ये नागरीकांना प्राप्त झाली आहे.

अ. भाषण व विचारस्वातंत्र्य: लोकशाही शासन हे चर्चेचे शासन असते. म्हणून भारतीय नागरीकांना संविधानाने भाषण व विचारस्वातंत्र्य दिले आहे. त्याचबरोबर टिका करण्याचे, लेखन व मुद्रण स्वातंत्र्य देखील देण्यात आले आहे. सार्वजनिक हिताला बाधा पोहचणार नाही यासाठी बंधने घातली आहे. देशाचे सर्वाभौमत्व, एकात्मता, पराराष्ट्र संबंध देशातील शांतता व सुव्यवस्था यांना बाधा पोहचू नये तसेच कोर्टाची किंवा कोणत्याही व्यक्तीची बदनामी होईल असे व्यक्तव्य यावर मर्यादा घातली आहे.

ब. शांततापूर्वक शस्त्राशिवाय सभा भरविण्याचे स्वातंत्र्य: आपले विचार, मते, लोकांपुढे मांडण्यासाठी सभा, संम्मेलने बैठका घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

तथापी या बैठका शस्त्रविहीन असाव्यात देशातील शांतता सुव्यवस्था, सार्वभौमत्व, राष्ट्रीय ऐक्य यांना बाधा ठरू नये. यासाठी बंधने घालण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला आहे.

क. संस्था व संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य: व्यक्ती तसेच समाजाच्या विकासासाठी संस्था व संघटना स्थापन करण्याचे अधिकार देण्यात आले आहे. यानुसार सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, संस्था–संघटना कोणतेही भारतीय नागरीक स्थापन करू शकतात. मात्र हा अधिकार अमर्याद नसून राष्ट्रीय एकात्मता, सार्वजनिक स्वास्थ, नितीमत्ता यांना बाधा निर्माण होणार असेल तर राज्य त्यावर मर्यादा घालु शकते.

ड. भारतात सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य: या अधिकारानुसार नागरीकांना भारतीय प्रदेशात कुठेही मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मात्र यावर देखील सार्वजनिक हित व सुव्यवस्थेच्या दृष्टीने काही बंधने घालण्यात आली.

इ. भारतात कुठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य: राज्यघटनेनुसार भारतीय नागरिकांना भारताच्या कोणत्याही प्रदेशात स्थायीक होवून वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य मिळालेले आहे. म्हणजेच कोणताही नागरीक कोणत्याही घटक राज्यात जावून वास्तव्य करू शकतो.

ई. कोणताही धंदा, व्यवसाय किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य: नागरीकाला स्वेच्छेनुसार उपजिवेकेसाठी कोणताही धंदा, व्यवसाय अथवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. मात्र समाजहिताच्या दृष्टीने सरकार काही व्यवसायावर नियंत्रण ठेवू शकेल.

ए. व्यक्तीस्वातंत्र्याची हमी: १९ व्या कलमानुसार नागरीकाला वरील प्रमाणे ६ स्वातंत्र्ये दिली आहेत. तर या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी कलम २०, २१, २२ मध्ये महत्वाच्या तरतुदी सांगितल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने जोपर्यंत गुनहा सिध्द होत नाही तोपर्यंत शिक्षा देता येणार नाही. एकाच गुन्हयासाठी एकापेक्षा जास्त वेळा शिक्षा दिली जाणार नाही. अटक झालेल्या व्यक्तीस कोणत्या गुन्हयासाठी शिक्षा झाली हे जाणुन घेण्याचा अधिकार आहे. तसेच त्याला २४ तासाच्या आत न्यायालयासमोर उभे करण्यात येईल.

### ३. शोषणाविरूध्दचा अधिकार:

कलम २३ (१) अनुसार माणसांचा अपव्यापार व वेठबिगारीस मनाई करण्यात आली. या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध ठरतो.

कलम २३ (२) अनुसार सार्वजनिक प्रयोजनाकरीता सेवा करावयाला लावण्यास राज्याला या कलमेतील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही. व अशी सेवा करावयास लावताना केवळ धर्म, वंश, जात, या वर्ग यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

कलम २४ नुसार चौदा वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी व अन्य जोखमीच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे.

### ४. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार:

भारतीय घटनेच्या कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे वर्णन केले आहे. कलम २५ नुसार 'सार्वजनिक सुव्यवस्था, नितीमत्ता व स्वास्थ यात बाधक नसणाऱ्या बाबतीत सर्व नागरीकांना आपल्या विवेकानुसार वागण्याचे समान हक्क आहेत. तसेच स्वधर्माचे आचरण, प्रचार व उच्चार करण्याचा हक्क आहे. '' परंतु समाजसुधारणेचे कायदे करून अस्पृश्यता निर्मुलन, नरबळी, बहुपत्नीत्व अशा अनिष्ठ रूढींवर बंधन घालण्याचा अधिकार राज्यास आहे. तसेच धार्मिक संस्था जर राजकीय, आर्थिक किंवा अन्य स्वरूपाची कामे करीत असतील तर अशा कार्यावर सरकार नियंत्रण ठेवू शकेल.

क्लम २६ नुसार प्रत्येक धर्म संप्रदायास धार्मिक संस्था स्थापन करण्याचा त्याचा कारभार पाहण्याचा व संपत्ती बाळगण्याचा अधिकार आहे. तर कलम २७ नुसार कोणत्याही धर्माच्या प्रसारासाठी, प्रचारांसाठी जबरदस्तीने आर्थिक निधी गोळा करण्यावर बंदी घातली आहे. कलम २८ प्रमाणे पूर्णपणे शासकीय खर्चावर चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत कोणतीही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. मात्र गैरशासकीय शैक्षणिक संस्थामध्ये धार्मिक शिक्षण देण्यास काहीही हरकत नाही. अर्थात ते शिक्षण घेतलेच पाहिजे अशी सक्ती कोणावरही करता येणार नाही. भारतात 'धर्मनिरपेक्ष राज्य' निर्मितीच्या दृष्टीने हा अधिकार अतिशय महत्वपूर्ण आहे.

### ५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार:

भारतातील विविधता लक्षात घेवून हा अधिकार निर्माण करण्यात आला आहे. कलम २९ व ३० यामध्ये सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार समाविष्ठ आहेत. कलम २९ नुसार भारतात कोठेही राहणाऱ्या नागरीकाला समुहाला स्वत:ची भाषा, लिपी, संस्कृती याची जोपासना करण्याचा अधिकार आहे. शासकीय खर्चावर चालणाऱ्या कोणत्याही शिक्षण संस्थेला केवळ धर्म, वंश, जात, भाषा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारता येत नाही. मात्र

शिस्त, पात्रता, लिंग, जन्मस्थान यावरून प्रवेश नाकारू शकतात.

कलम ३० नुसार अल्पसंख्याक समुदायांना आपल्या इच्छेनुसार धर्म किंवा भाषेच्या आधारावर शिक्षण संस्था स्थापन करण्याचा व ती चालविण्याचा अधिकार असेल कोणत्याही शिक्षण संस्थेला मदत करताना राज्य पक्षपात करणार नाही. या अधिकारामुळे भारतातील विविध, धार्मिक, अल्पसंख्यकांना आपल्या राष्ट्रीय, भाषा, अस्मिता यांचे संरक्षण करणे सहज साध्य झाले आहे.

भारतातील विविध अल्पसंख्याक समुदायांना त्यांची वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण ओळख टिकवून ठेवता यावी व त्यांच्यावर इतरांची संस्कृती लादली जाऊ नये यासाठी सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार उपयोगी ठरतात.

**६. घटनात्मक उपयाचा अधिकार:**

संविधनाने जे मुलभूत अधिकार नागरीकांना दिलेले आहे. ते उपभोगता आले पाहिजे व त्याचे संरक्षण झाले पाहिजे त्यासाठी घटनात्मक उपायाचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकाराची नोंद कलम ३२ ते ३५ मध्ये करण्यात आली आहे. या अधिकारानुसार नागरीकांना न्यायालयाकडे तक्रार करून आपल्या अधिकारावर झालेले अतिक्रमन दुर करता येते. शिवाय मुलभूत हक्कांच्या योग्य अंमलबजावणीसाठी ही दाद मागता येते. नागरिकांना दिलेल्या मुलभूत अधिकाराचे जर संरक्षण होत नसेल तर ते अधिकार निरर्थक ठरतात. म्हणूनच भारतीय संविधानात अधिकाराच्या संरक्षणासाठी घटनात्मक उपयाचा अधिकार समाविष्ट करण्यात आला आहे. नागरीक मुलभूत अधिकाराच्या संरक्षणसाठी जेव्हा न्यायालयाकडे अर्ज करते तेव्हा न्यायालयाला पुढील ५ प्रकारचे आदेश काढता येतात. हे आदेश सर्व व्यक्ती, संस्था, संघटना व राज्य यावर बंधनकारक असतात. ते आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

१. बंदी प्रत्यक्षीकरण
२. परमादेश
३. प्रतिषेद
४. अधिकार पृच्छा
५. उत्प्रेषण

उपरोक्त ५ प्रकारच्या आदेशातून घटनात्मक उपयाच्या अधिकाराचा अवलंब करून मुलभूत अधिकाराचे संरक्षण केले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कलमातील तरतुदीचे वर्णन करतांना म्हणतात की, ३२ वे कलम हे संविधानातील सर्वात महत्वाचे कलम असून घटनात्मक उपायसोजनेचा अधिकार हा राज्यघटनेचा आत्मा व हृदय आहे.

अशाप्रकारे भारतीय संविधानात कलम १२ ते ३५ मध्ये मुलभूत अधिकार समाविष्ठ आहेत. भारतात राजकीय लोकशाहीच्या विकासाबरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित व्हावी व सामाजिक न्यायावर आधारीत समाजरचना निर्माण व्हावी हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्व यातील फरक:**

मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे ही भारतीय संविधानाची महत्वपूर्ण वैशिष्टे आहेत. या दोघांचे हेतू देखील एकच आहे. भारतीय नागरीकांना स्वातंत्र्याची हमी देवून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी याची तरतुद केली आहे. देशात सामाजिक, आर्थिक, राजकीय लोकशाही प्रस्थापित करून कल्याणकारी राज्य स्थापन करणे हा त्याचा मुलभूत हेतू आहे. परंतु मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे यात पुढीलप्रमाणे फरक दिसून येतो.

१. वैधानिक दृष्टीकोनातून फरक:मुलभूत अधिकरांना कायदेशीर संरक्षण असते. मात्र मार्गदर्शक तत्वांना कायद्याचे पाठबळ असत नाही मुलभूत अधिकाराचा भंग झाल्यास न्यायालयाकडे दाद मागता येते. मुलभूत अधिकारासंबंधी राज्यशासनावर काही बंधने असतात. त्याचे पालन करणे राज्यास आवश्यक असते. परंतु मार्गदर्शक तत्वाचे पालन करणे राज्यास बंधनकारक नाही. त्याचे पालन राज्याच्या इच्छेवर अवलंबून असते.

२. स्वरूपातील फरक: मुलभूत अधिकाराचे स्वरूप नकारात्मक आहे. तर मार्गदर्शक तत्वांचे स्वरूप सकारात्मक आहे. व्यक्ती स्वातंत्र्यासाठी राज्याने ही गोष्ट करू नये असे मुलभूत अधिकार सांगतो.

३. व्याप्तीमधीली फरक: मुलभूत अधिकराचे क्षेत्र केवळ व्यक्ती स्वातंत्र्यपुरते मर्यादीत आहे. त्यांच्या संबंध केवळ व्यक्तीशी येतो त्यातुलनेत मार्गदर्शक तत्वाचे क्षेत्र अतिशय व्यापक आहे. मार्गदर्शक तत्वामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच आंतराष्ट्रीय संबंधविषयक तत्वे समाविष्ठ असून त्यांचा संबध राज्याच्या ध्येयधोरणाशी आहे.

४. न्यायलयीन संरक्षण: मुलभूत अधिकार हे न्यायप्रविष्ट आहेत म्हणजेच त्यांना न्यायलयीन संरक्षण प्राप्त झालेले आहे मुलभूत अधिकारावर जर कोणी अतिक्रमण केले असेल तर न्यायालयात दाद मागुण न्याय मिळविता येतो. परंतु मार्गदर्शक तत्वांना न्यायलयीन संरक्षण नाही. त्याच्या अंमलबजावणीसाठी न्यायलयात जाता येत नाही.

५. मर्यादा: सविधानुसार आणिबाणीच्या काळात मुलभूत अधिकार स्थगित करण्याची तरतुद केलेली आहे. परंतु मार्गदर्शक तत्वे कोणत्याही परिस्थितीतून मर्यादीत अथवा स्थगित होत नाही.

६. मुलभूत अधिकाराद्वारे राज्य शासनाचे साध्य कोणते याचे विवेचन केलेले आहे. तर मार्गदर्शक तत्वामध्ये ही साध्य पूर्णत्वास नेणाऱ्या साधनांचे विवेचन करण्यात आलेले आहे.

७. मुलभूत अधिकार हे राजकीय स्वरूपाचे आहेत. त्यातून राजकीय लोकशाहीचा विकास साधण्याचा प्रयत्न झालेले आहे. तर मार्गदर्शक तत्वामध्ये राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक, आर्थिक लोकशाही निर्माण करण्यावर जोर देण्यात आला आहे.

८. मुलभूत अधिकार व्यक्तीविकासाला प्राधान्य देतात तर मार्गदर्शक तत्वे सार्वजनिक हिताला प्राधान्य देतात.

९. मुलभूत अधिकार हे व्यक्ती व राज्य यांचे संबंधाचे स्पष्टीकरण देतात. तर मार्गदर्शक तत्वे राज्याचे अंतर्गत व बाह्य धोरण यावर प्रकाश टाकतात.

१०. मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे यांत संघर्ष झाल्यास कोण श्रेष्ठ ठरेल. याबाबत बरेच वाद आहेत. परंतु २५ व्या व ४२ व्या घटना दुरूस्तीने मार्गर्शक तत्वाचे श्रेष्ठतव प्रतिपादन केले आहे.

११. मुलभूत अधिकारांना कायदेशीर किंवा न्यायालयीन पाठबळ आहे. तर मार्गदर्शक तत्वांना जागृत लोकमताचा पाठींबा आहे. मार्गदर्शक तत्वे नैतीक स्वरूपाची असते.

अशा प्रकारे मार्गदर्शक तत्वे व मुलभूत अधिकार यामध्ये फरक दिसून येतो तथापी मार्गदर्शक तत्वे व मुलभूत अधिकार परस्पर विरोधी नसुन परस्पर व्यक्ती पुरकच आहे. या दोघांचाही हेतु समानच आहे. मुलभूत अधिकारामुळे देशात राजकीय लोकशाही अस्तीत्वात आली असली तरी तिचे सामाजिक, आर्थिक, लोकशाहीत रूपांतर करावयाचे असेल तर राज्याला मार्गदर्शक तत्वाचा स्वीकार करावाच लागेल. व्यक्ती व समाज हितासाठी मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्व दोन्ही सारखीच महत्वाची ठरतात.

**मुलभूत अधिकारांची वैशिष्टे:**

१. मुलभूत अधिकार हे संविधानिक अधिकर असून त्यांना इतर कायदेशी अधिकारांपेक्षा सर्वोच्च दर्जा लाभलेला आहे.

२. भारतीय नागरीकांसाठी नमूद करण्यात आलेले काही मुलभूत अधिकार देशात अस्थायी वास्तव्य करणाऱ्या परकीय नागरिकांना देखील उपलब्ध आहेत. उदा. कायद्यापुढील समानता, धार्मिक स्वातंत्र्य, जिवित स्वातंत्र्य इ. तथापि भाषण स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य यांसारखे अन्य हक्क मात्र परकीयांना उपलब्ध होत नाही.

३. सर्व मुलभूत अधिकारांना न्यायालयाचे सरंक्षण प्राप्त झालेले आहे. त्यामुळ शासनाचा एखादा कायदा वा आदेश किंवा त्यांचा काही भाग मुलभूत अधिकारांचा संक्षेप करीत असेल वा त्यावर अतिक्रमण करीत असेल तर सर्वोच्च किंवा उच्च न्यायालय असा कायदा वा आदेश किंवा त्यांचा काही भाग संविधानाचा भंग करीत असल्यामुळे अवैध घोषित करू शकते.

४. सर्वांत महत्वाचे वैशिष्टे म्हणजे नागरिकांना प्रदान केलेल्या मुलभूत अधिकारांवर संविधानानेच काही बंधने घातलेली आहेत. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर मुलभूत अधिकार हे अमर्यादित नाहीत.

५. सेनादल, गुप्तचर संस्था यासारख्या विशिष्ट प्रयोजनासाठी स्थापन केलेल्या क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना हे हक्क लागू करताना त्यात फेरबदल करण्याचा अधिकार संसदेस आहे.

६. भारतीय संविधानातील मूलभुत अधिकार केंद्र शासन, राज्यशासन तथा स्थानिक स्वराज्य संस्थावंर बंधनकार आहेत. काही निवडक अधिकार खाजगी व्यक्ती व संस्था यांच्यावरही बंधनकारक आहेत. उदा. कलम २४ नुसार चौदा वर्षाखालील बालकांना कारखान्यात व खाणीत कामावर ठेवण्यास केलेला प्रतिबंध कलम २३ नुसार वेठबिगारीवर घालण्यात आलेली बंदी उपरोक्त उल्लेखित सर्वांना लागू आहे.

७. ब्हुतांशी मुलभूत अधिकार हे नकारात्मक स्वरूपाचे आहेत. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर ते शासनावरील बंधने वा मर्यादा व्यक्त करतात.

८. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात कलम १९ मध्ये नमूद करण्यात आलेले ६ स्वातंत्र्ये आपोआपच स्थगित होतात.

**मुलभूत अधिकारचे सामाजिक राजकीय परिणाम:**

१. अधिकार अपूरे आहेत: टीकाकारांच्या मतानुसार भारतीय संविधानात समाविष्ठ करण्यात आलेले मुलभूत अधिकार अपूरे आहेत. काही महत्वाचे अधिकार नागरीकांना आणखी देणे आवश्यक होते. परंतु त्यांचा समावेश संविधानात करण्यात आलेला नाही. काम मिळविण्याचा हक्क, बेकारी भत्ता, अपंगत्व, अपघात, आजारपण व म्हातारपणात मदत मिळण्याच्या हक्कांचा समावेश मुलभूत अधिकारात करावयास हवा होता. परंतु यासारख्या महत्वाच्या अधिकाराचा समावेश केला नसल्याने मुलभूत अधिकाराला पूर्णत्व आले नाही ते अपुरे आहेत.

२. अधिकारावरील बंधने: संविधानात समाविष्ठ सर्व अधिकारावर इतक्या मर्यादा व बंधने घालण्यात आल्या आहेत की, त्याचे स्वरूपच बदलून गेले आहे. खऱ्या अर्थाने व्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी व नागरीकांच्या सर्वांगीण विकासासाठी मुलभूत अधिकार देण्यात आले आहेत. परंतु त्यावरील मर्यादा लक्षात घेतल्यास मुलभूत अधिकाराच्या प्रकरणाला मुलभूत अधिकारावरील मर्यादा

असे शिर्षक देणे अधिक योग्य ठरले असते असे टिकाकार म्हणतात. नागरीकाला जेवढे अधिकार दिले आहेत ते सर्व मर्यादीत झाले आहेत.

३. आणिबाणीच्या काळात स्थगीत: देशात आणिबाणी लागु झाल्यास मुलभूत अधिकार स्थगीत होतात. अशावेळी मुलभूत अधिकाराच्या संरक्षणार्थ व्यक्तीस न्यायालयात जाता येत नाही. त्यामुळे मुलभूत अधिकाराचा एवढा संकोच होता की, व्यक्तीस्वातंत्र्य पूर्णत: नष्ट होवून जाते. सत्तारूढ पक्ष आणिबाणीच्या काळात या तरतुदीचा प्रचंड गैरवापर करतो. इंदिरा गांधीच्या कार्यकाळात १९७६—७७ मधील आणिबाणीत मुलभूत अधिकाराचा किती प्रचंड संकोच झाला होता. हे अनुभरवावरून सांगता येईल त्यावेळे हे अधिकार निरर्थक ठरले होते.

४. विवादास्पद अधिकार: मुलभूत अधिकारात बदल करण्याचा अधिकार कायदेमंडळाला असावा की नसावा यासंबंधी आजतपर्यंत वादग्रस्त चर्चा व निर्णय झालेले दिसतात. शंकरप्रसाद विरूध्द भारत सरकार खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने मुलभूत अधिकारात संसदेने केलेल्या दुरूस्त्या कायदेशीर आहेत. असा निर्णय दिला. परंतु १९६७ मध्ये गोलखनाथ विरूध्द पंजाब राज्य या खटल्यास सर्वोच्च न्यायालयाने कायदेमंडळाला मुलभूत अधिकारात दुरूस्ती करण्याचा अधिकार नाही. असा परस्परविरोधी निर्णय दिला.

५. नितीदर्शक तत्वाचे श्रेष्ठत्व: मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे यात श्रेष्ठत्वाचा वाद आहे. तथापी २५ व्या व ४२ व्या घटनादुरूस्ती मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीत मुलभूत अधिकाराहून श्रेष्ठ स्थान दिले आहे.

६. मुलभूत अधिकाराच्या विरोधी तरतुदी: व्यक्तीस्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी मुलभूत अधिकाराची तरतुद करण्यात आली असली तरी संविधानातील काही तरतुदी मुलभूत अधिकाराचा संकोच करतात. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी राज्याला टाडा, पोटा,मोक्का, प्रतिबंधक स्थानबध्दता यासारखे कठोर कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

अशाप्रकारे मुलभूत अधिकारावर कठोर टीका होत असली तरी त्याचे महत्व नाकारता येत नाही.

**संदर्भ** :

विनायक घायाळ — भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार एक परामर्श, के सागर पब्लिकेशन, २०१४

प्रा. श्रीमती सुधाराणी श्रीवास्तव व आशा श्रीवास्तव — महिला शोषण आणि मानवाधिकार, अर्जुन प्रकाशन, दिल्ली, २००४

प्रा. शोभा कशिसागर — समग्र मानवी हक्क, के सागर प्रकाशन, २०१३, २०१४

प्रा. दत्तात्रय सांगोलेकर — मानवी हक्क, जिज्ञासा प्रकाशन, २०१३, २०१४